महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना पर्यटन विकास व देखभालीकरीता नाममात्र दराने ३० वर्षांच्या कराराने भाडेपट्ट्यावर मंजूर करण्यात आलेल्या मौजा अंबाझरी, जिल्हा नागपूर येथील खसरा क्र. १, नगर भुमापन क्र. १ मधील ४४ एकर इतक्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टा कराराची ३० वर्षे ही मुदत सुधारीत करुन त्याऐवजी भाडेपट्टा कराराची सदर मुदत ही ९९ वर्षे इतकी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१५/प्र.क्र.२९९/ज-८.
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, १ ला मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९.

संदर्भ :- १. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.- जमीन २०१५/ प्र.क्र.२९९/ज-८, दि.२१.०७.२०१७
२. सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचे क्र. टीडीएस-२०१८/१०/ प्र.क्र.९९९/पर्यटन, दि.०५.०७.२०१९ चे पत्र.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे क्र.मपविम/जवमा/अंबाझरी/२०१८/१६८१ दि.०५.०७.२०१९ चे पत्र.
४.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे क्र.मपविम/बांधकाम/अंबाझरी प्रकल्प /२०१९/२५० दि.१०.०७.२०१९ चे पत्र.
५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे क्र. मपविम/ बांधकाम/अंबाझरी- पीपीपी /२०१९/२९७ दि.२४.०७.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

मौजा अंबाझरी, जिल्हा नागपूर येथील खसरा क्र. १, नगर भुमापन क्र. १, मधील ४४ एकर इतकी शासकीय जमीन पर्यटन विकास व देखभालीसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.- जमीन २०१५/ प्र.क्र.२९९/ज-८, दि.२१.०७.२०१७ अन्वये वार्षिक रू.१/- या नाममात्र दराने भुईभाडे आकारून ३० वर्षांच्या कराराने भाडेपट्ट्यावर देण्यात आली होती.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना पर्यटन विकास व देखभालीकरीता नाममात्र दराने ३० वर्षांच्या कराराने भाडेपट्ट्यावर मंजूर करण्यात आलेल्या मौजा अंबाझरी, जिल्हा नागपूर येथील खसरा क्र. १, नगर भुमापन क्र. १ मधील ४४ एकर इतक्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टा कराराची ३० वर्षे ही मुदत सुधारीत करुन त्याऐवजी भाडेपट्टा कराराची **सदर मुदत ही ९९ वर्षे** इतकी करण्याबाबतचा प्रस्ताव सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाने संदर्भाधिन क्र.२ येथील पत्रान्वये सादर केला होता.

नागपूर येथील अंबाझरी तलाव / उद्यान परिसरातील संपूर्ण जागेचा एकत्रित सुनियोजित विकास साधल्यास त्यातून स्थानिक पर्यटनाबरोबरच प्रादेशिक पर्यटनाला चालना

मिळण्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना पर्यटन विकास व देखभालीकरीता नाममात्र दराने ३० वर्षांच्या कराराने भाडेपट्ट्यावर मंजूर करण्यात आलेल्या मौजा अंबाझरी, जिल्हा नागपूर येथील खसरा क्र. १, नगर भुमापन क्र. १ मधील ४४ एकर इतक्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टा कराराची ३० वर्षे ही मुदत सुधारीत करुन त्याऐवजी **भाडेपट्टा कराराची सदर मुदत ही ९९ वर्षे** इतकी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ह्या संदर्भात दि. ३० जुलै, २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत विचार विनिमय होऊन झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

<u>शासन निर्णय</u>:-

(१) दि.०३ जुलै, २०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जमीन-२०१५/ प्र.क्र.२९९/ ज-८, दि.२१.०७.२०१७ अन्वये पर्यटन विकास व देखभालीकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारुन, नियमित अटी व शर्तीवर ३० वर्षांच्या कराराने भाडेपट्ट्यावर देण्यात आलेल्या मौजा अंबाझरी, जिल्हा नागपूर येथील खसरा क्र. १, नगर भुमापन क्र. १, मधील **४४ एकर इतक्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टा कराराची सदरहु ३० वर्षे ही मुदत सुधारीत करुन त्याऐवजी भाडेपट्टा कराराची सदर मुदत** ही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३८ व ४० आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३५ अन्वये शासनास प्राप्त अधिकारात **९९ वर्षे इतकी** करण्यास व सदर भाडेपट्ट्याचे त्याच तत्वावर नुतनीकरण करण्याची तरतूद भाडेपट्ट्यात अंतर्भूत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना प्रदान करण्यात आलेल्या मौजा अंबाझरी, जि. नागपूर येथील उक्त **शासकीय जमिनीच्या भाडेपट्टा कराराची ३० वर्षे ही मुदत सुधारीत करुन त्याऐवजी भाडेपट्टा कराराची सदरहु मुदत ही जरी ९९ वर्षे इतकी करण्यात येत असली तरी,** उक्त शासकीय जमिनीवरील अंबाझरी तलाव, जि. नागपूर विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत **खाजगी संस्थांकडून ज्या कालावधीकरीता आणि ज्या अटी व शर्तींवर निविदा मागविण्यात आल्या असतील त्याच कालावधीकरीता आणि त्याच अटी व शर्तींवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने खाजगी संस्थांसोबत सवलत करारनामा करणे आवश्यक राहील.**

(३) या संदर्भातील **शासन निर्णय**, महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२०१५/ प्र.क्र.२९९/ ज-८, **दि.२१.०७.२०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या इतर अटी व शर्ती कायम राहतील.**

०२. सदर शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, नगर विकास विभाग-१ यांची सहमती/ विचारविनिमय करुन तसेच, वित्त विभागाशी विचारविनिमय करुन त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१८३/ व्यय-९/२०१९, दि.०७.०५.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१४५१०७००१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sharad Madhavrao Doke

Digitally signed by Sharad Madhavrao Doke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49a6844e93d7a1180c3226081e6f456ddf8d7b1bc67bc4bd78fa78029ab559db, cn=Sharad Madhavrao Doke
Date: 2019.08.20 19:30:10 +05'30'

(शरद डोके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
७) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२.
८) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.
९) प्रधान सचिव, (नगर विकास विभाग-१), मंत्रालय,मुंबई -३२.
१०) प्रधान सचिव, (नगर विकास विभाग-२), मंत्रालय,मुंबई -३२.
११) सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१२) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
१३) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) जिल्हाधिकारी, नागपूर.
१५) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,(१) मुंबई -३२.
१६) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,(२) नागपूर.
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मादाम कामा रोड, मुंबई.
१८) नगर विकास विभाग (नवि-९/नवि-२६), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
१९) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
२०) सह सचिव (कार्यासन ज-८) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
२१) सर्व सह सचिव /उप सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
२२) निवड नस्ती, कार्यासन ज-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.